सो.रजि.नं.एम.एच.५१४/ए/एन/आर/८२,बी.पी.टी.रजि.नं.एफ/४६८ (अहमदनगर)
एन.एस.के./टेक/१२ ए. (ए)/५८/१९९४-९५

# श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निघोज

## ता. पारनेर, जि. अहमदनगर

30

जा.क्र. मळगंगा ट्रस्ट/५८/२०२५-२६ दिनांक : २०/०८/२०

प्रति
मान. लोकनेते श्री. निलेशजी लंके साहेब,
खासदार, अहिल्यानगर दक्षिण मतदार संघ.

विषय - श्री क्षेत्र कुंड पर्यटन स्थळ निघोज येथे बी.एस.एन.एल. इंडस कंपनीचा टॉवर बसविणेबाबत...

मा. महोदय,

वरील विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, श्री मळगंगा देवस्थानला जानेवारी २०११ मध्ये "ब" वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा प्राप्त झालेला असून पर्यटन व तिर्थक्षेत्राच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर विकासकामे झालेली आहेत. ही विकासकामे करत असताना आपण मोलाचे सहकार्य केल्यामुळे आपले श्री मळगंगा ट्रस्टच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत आहेत. आजरोजी वर्षभरात जवळपास १५ ते २० लाख भाविक व पर्यटक हे पर्यटन व तिर्थस्थळाच्या ठिकाणी दर्शनाचा लाभ घेत असतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून श्री क्षेत्र कुंड पर्यटन स्थळाला भेट देतात. परंतू सदर ठिकाणी कोणत्याही कंपनीचे टॉवर नसल्याने मोबाईलला नेटवर्क येत नाही त्यामुळे पर्यटक व भाविकांची गैरसोय निर्माण होते. परिणामी पर्यटक व भाविक जास्त वेळ थांबण्यास तयार नसतात.

तरी पर्यटक व भाविकांच्या सोयीसाठी टॉवर होणे अत्यंत गरजेचे आहे. तरी आपण आपल्या स्तरावर गट नं. ६७ श्री क्षेत्र कुंड याठिकाणी टॉवर बसविणेसाठी सहकार्य करावे ही विनंती.
कळावे.

आपला विश्वासू,

श्री. विश्वास ठकाराम शेटे
सहसचिव
श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निघोज